RNI No: MAHMAR / 2004 / 13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016

# अजायब ✸ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : अकरा | अंक : दहावा | एप्रिल २०१४




**प्रश्नोत्तरे** (प्रेमींच्या प्रश्नांची उत्तरे) 5

**प्रार्थना** (सत्संग : परमसंत अजायब सिंह महाराजजी) 7

**धन्य अजायब** (दिल्ली शहरातील कार्यक्रमाची माहिती) 33

**सावन प्यारे बक्शन हारे** (एक भजन) 34


मालक मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट १२५, वडाला उद्योग भवन, मुंबई – ४०००३१ येथे छापून सी/५०३ म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई – ४०००६७ फोन नं: (०२२) २४९६५००० येथून प्रसिद्ध केले.



# प्रश्नोत्तरे

परम संत अजायब सिंह महाराजजींनी प्रेमींच्या प्रश्नांची दिलेली उत्तरे,
संतबानी आश्रम,१६पी.एस. राजस्थान - १२ जानेवारी १९८७

**प्रेमी** : आपल्या हातावरची खूण आपणांस कधी व कशी लाभली?

**बाबाजी** : बंधुनो! संतवाणी मासिकामध्ये याविषयावर बरेच लेख लिहिले गेले आहेत, परंतु मला खेद वाटतो की ते मासिक पालक स्वतःही वाचत नाहीत तसेच मुलांनाही वाचून दाखवित नाहीत.

मी सांगत असतो की लहानपणी मला एक प्रकारचा रोग झाला ज्यामुळे माझ्या अंगावर सर्वत्र फोड उठले होते व त्यामध्ये खूप पू तयार झाला होता. शरीरावर कोड उठल्याप्रमाणे ते दिसत हाते. त्या फोडांनी संपूर्ण शरीर व्यापले होते. त्यावर बराच औषधोपचार केला, हिंदूस्थानातील अनेक तिर्थस्थानांवर जाऊन मी स्नान देखील केले, परंतु त्या फोडांचे शमन झाले नाही. त्या फोडांना कपड्यांचा नुसता स्पर्श जरी झाला, तरी वेदनेने मला खूप रडू येत असे. काही माणसे तर मला त्यांच्या जवळदेखील येऊ देत नसत. प्रत्येकजण माझी घृणा करीत असे.

अशा अवस्थेमध्ये माझे वडील मला बाबा बिशनदासजींकडे घेऊन गेले. बाबा बिशनदासजींची व माझी ती पहिलीच भेट होती. माझे वडील त्यांच्यासमोर रडले व म्हणाले हा माझा एकटाच मुलगा असून त्याची अशी अवस्था झाली आहे. त्यावर बाबा बिशनदासजी माझ्यावर कृपा करीत म्हणाले,''ही दैवी आपत्ती (ईश्वर-ईच्छा) आहे, त्यामुळे याच्या शरीरावर निराळे काही डाग (खूणा) पडणे गरजेचे आहे.'' साधारणपणे अशी खूण आजाऱ्याच्या कपाळावर केली जात असे म्हणून माझ्या हातावर असलेली खूण ते माझ्या कपाळावर करू लागले होते, तेव्हा माझे वडील रडत-रडत म्हणाले, ''असे करू नका, ते विचित्र वाटेल.'' त्यावर बराच विचार केल्यावर बाबा बिशनदासजी म्हणाले

की,''पंजाबमध्ये तख्तपुरा नावाचे एक तिर्थस्थान आहे. तेथे गेल्यावर मी यावर काहीतरी मार्ग सुचवेन.'' तख्तपुरा येथे गुरु नानक देवजी महाराजजींनी काही काळ जमिनीखाली बसून ध्यान-अभ्यास केला होता.

संत-सतगुरु त्यांच्या सेवकांची कामे तर करतात, परंतु ते त्यांना असे दर्शवत नाहीत की मी ते केलेले आहे. तेथे गेल्यावर बाबा बिशनदासजींनी ही खूण माझ्या हातावर (व अंगावर इतर खूणा) घालावयास लावल्यानंतर मी तेथून चार मैल अंतरावर असलेल्या चक्क सेदो या गांवी चालत चालत आलो. तेथे पोहचेपर्यंत माझे सर्व शरीर स्वच्छ झाले होते, त्यामधून पू येणे बंद झाले होते, ना मला कोणतीही वेदना होत होती.

मी तुमच्यासमोर ज्या स्वच्छ शरीराने बसलो आहे, ती बाबा बिशनदासजी महाराजजींची कृपा आहे. कोणत्याही प्रकारचा औषधोपचार न करता, मला त्यांनी त्यांच्या कृपेनेच बरे केले.

लहानपणी आई-वडीलांनी माझे नांव सरदारा सिंह असे ठेवले होते. परंतु नंतर बाबा बिशनदासजींनी माझे नाव अजायब सिंह असे ठेवले. ते म्हणाले की, सरदारा सिंह नावाचे काही महत्व नाही, आता तू सुंदर (सोहणा) झालेला आहेस, त्यामुळे त्यांनी माझे नाव अजायब सिंह ठेवले. मी माझी सही देखील अजायब सिंह या नांवानेच करीत आहे.

पंजाब येथील माझ्या मालकीच्या जमीन-जुमल्याची नोंद सरदारा सिंह या नांवानेच होती. त्यापैकी बरीचशी जमीन सरकारने सैनिकी छावणीसाठी ताब्यात घेतली होती. त्या जमीनीचे पैसे घेण्यासाठी जाताना मी माझ्या हातावर सरदारा सिंह असे लिहून ठेवले होते, जेणेकरून तेथे सही करताना मी चुकून अजायब सिंह असे लिहू नये. तसे झाले असता त्या लोकांनी मला पैसे दिले नसते. हे सर्व तुम्हाला सांगण्यामागे माझी हीच भावना आहे की संत-सतगुरु त्यांच्या शिष्यांवर नेहमीच कृपा करीत असतात, परंतु ती करून उपकार केले असे ते कधीच दर्शवीत नाहीत.

***

# आदर्श विवाह

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज, गुरु नानक देवजींची वाणी
संतबानी आश्रम, १६ पी.एस. राजस्थान – १३ एप्रिल १९९६

परमपिता सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी आपणां गरीब आत्म्यांवर अनंत उपकार केले, कृपा केली. आजचा बैसाखीचा पवित्र दिवस जगभरात, कोणत्या ना कोणत्या स्वरूपामध्ये साजरा केला जातो. परंतु शिख इतिहासामध्ये या दिवसाची खास महानता आहे. आजच्या दिवशी गुरु गोविंद सिंहजी महाराजजींनी दगडाची पुजा करुन–करुन दगड बनलेल्या व निद्रवस्थेत राहून परमेश्वराचे विस्मरण झालेल्या आत्म्यांना जागृत केले होते व त्यांना या संसारात जगण्याची रिती–भाती समजावली होती, तसेच मनुष्यजन्म किती अनमोल आहे, हे देखील समजावून सांगितले.

या जगात सर्वात मोठे पाप म्हणजे स्वत: भयभीत होणे किंवा एखाद्यास भयभीत करणे; जो कोणी दुष्कृत्ये (कुकर्म) करतो, तोच भयभीत होतो. तसेच ज्याच्या अंतरात अहंकार असतो तोच इतरांना भयभीत करतो. त्यामुळे भयभीत होणे अथवा करणे दोन्ही महापाप आहेत. गुरुसाहेब म्हणतातः

***भय काहू को दे नेह भय मानत आन।***

प्रियजनहो! केवळ कानात फुंकर मारल्याने एखादा व्यक्ती शिष्य बनत नाही. तुम्हांस जी नामदान रूपाने वस्तू मिळालेली आहे, ती परंपरेने सतगुरु त्यांच्या शिष्यास देत आले आहेत. इतिहासात येते की आजच्या दिवशी गुरु नानक देवजी महाराजजींनी त्यांच्या शिष्यांची पारख करुन पाहिली (परिक्षा घेतली) की किती शिष्य मी सांगितलेल्या पद्धतीने ध्यान–अभ्यास करीत अंतर्यात जात आहेत व किती शिष्यांना मी दिलेली शिकवण समजली आहे? गुरुंची शिकवण खऱ्या अर्थाने तोच शिष्य समजतो, जो शिष्य सतगुरुंना अंतर्यात प्रगट करुन घेतो. त्यावेळी संपूर्ण संगतमधून फक्त भाई लैहणाच उत्तीर्ण झाला होता.

सतगुरु ज्या शिष्यांना नाम देतात, निःसंशय त्या सर्वांना ते मृत्युसमयी घेऊन जातात. परंतु जे शिष्य सतगुरु देहरुपात असतानाच त्यांची शिकवण अमलात आणून, ध्यान–अभ्यास करून पास होतात, तेच बहादूर आहेत.

त्याचप्रमाणे गुरु गोविंद सिंहजी महाराजांनी देखील आजच्या पवित्र बैसाखीच्या दिवशीच त्यांनी नामदान दिलेल्या सर्व व्यक्तींची पारख करण्याचे (परिक्षा घेण्याचे) ठरविले की पाहूया तरी की असे किती शिष्य आहेत ज्यांना मी दिलेली शिकवण समजलेली आहे की गुरु म्हणजे काय? नाम काय असते? तसेच किती शिष्य नामस्मरण करतात? जेव्हा गुरु गोविंद सिंहजींनी शिष्यांची पारख केली त्यावेळी पाच हजार शिष्यांचा जमाव एकत्रीत झाला होता असे इतिहासकारांनी नमुद केलेले आहे. खरंतर शिख समाजाचा इतिहास एकशे चाळीस वर्षांनंतर लिहिला गेला. परंतु त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या परदेशी मंडळींनीदेखील अनुमोदन दिले की त्यावेळी पाच हजार शिष्यांचा जमाव एकत्र झाला होता, ज्यामध्ये जाती–धर्माचा भेदभाव नव्हता.

कोणतेही संत या भूमंडळावर येऊन एखादी नवीन जात बनवित नाहीत वा एखादी अस्तित्वात असलेली जात नष्टही करीत नाहीत. त्या पाच हजार शिष्यांच्या जमावापैकी केवळ पाच शिष्यच त्या पडताळणीमध्ये उत्तीर्ण झाले होते. गुरु गोविंद सिंहजींनी त्या पाचही शिष्यांवर आपली कृपादृष्टी टाकून त्यांना स्वतःचेच स्वरूप बनवून टाकले.

मी नेहमी पुणे येथे केलेल्या माझ्या सिग्नलरच्या कोर्सचा उल्लेख करत असतो. सुरवातीला तेथील निर्देशकांची वर्तणूक आमच्याशी अतिशय कठोर होती. ते आम्हांस सांगत की तुम्ही येथे येतानाच तुमचा बाड–बिस्तरा बांधून यावा. कारण तुम्ही एखादी क्षुल्लक चूक जरी केलीत, तरीही आम्ही तुम्हांस येथून परत पाठवून देऊ. परंतु आम्ही जेव्हा त्या शिक्षकांचे आज्ञापालन केले, तेव्हा अशीही एक वेळ आली, जेव्हा त्यांनी आम्हांस आम्ही उत्तीर्ण झाल्या बद्दलचा दाखला दिला व आम्हांस सोबत बसवून प्रेमाने चहापाणी देखील पाजले. त्यावेळी ते आम्हांस म्हणाले, ''आता तुमच्या व आमच्यामध्ये कोणताही

फरक राहिला नाही. जी पदवी आमच्याकडे आहे, तीच पदवी तुमच्याकडे देखील आहे.'' याचप्रमाणे गुरु गोविंद सिंहजींनी त्यांच्या परिक्षणामध्ये उत्तीर्ण झालेल्या पाच शिष्यांना आपल्या दया–दृष्टीने आपल्यासमान बनविले. जेव्हा एखादा सेवक मन–इंद्रियांपासून आपली सुटका करवून घेतो, तेव्हा संतांचे हृदय प्रसन्न होते. आजच्या या पवित्र दिवसाची खूप महानता आहे. त्यामुळे मी स्वतःस अतिशय भाग्यवान समजतो की आजच्या दिवशी त्या महान संत सतगुरुंच्या स्मरणात बसण्याची संधी आपणांस लाभत आहे. गुरु नानक देवजींच्या वाणीमध्ये लिहिले आहेः

***सन्त सन्त को दो कर जानी, सो जन जान नर्क की खानि ।***

गुरु नानक देवजी व गुरु गोविंद सिंहजी एकच होते. सचखंडामधून येणारे सर्व संत एकमेकांचे परम मित्र असतात. त्यांचे आपआपसामध्ये अतिशय प्रेम असते. गुरु नानक देवजी त्याचा उल्लेख संतमंडळ असा करतात.

***सन्तमंडल ऊँहा का नाओं, दूख अंधेरा नहीं तह ठाओं ।***

जिथे रात्र व दिवस असा फरक नसतो, वेद–शास्त्रांची झंजट नसते, जन्म–मृत्यू नसतो, तो देश संतांचा (सचखंड) असतो. खरे तर आपल्यासारखे लोकच संता–संतांमध्ये भेदभाव करतात, कारण आपण ध्यान–अभ्यास करण्यात कुचराई करतो. आपण ध्यान–अभ्यास करीत नाही, त्यामुळे संतांच्या त्या पातळीपर्यंत पोहचत नाही. आपण जर त्या पातळीपर्यंत पोहचलो असतो, तर आपल्या लक्षात आले असते की कोणतेही संत आपणांस सांगत नाहीत की परमात्मा आपणांस जंगल–पर्वतावर वा आपला वेष बदलल्यास वा दूर–दूरवर परिक्रमा केल्याने भेटेल.

प्रियजनहो, आम्हांस या गोष्टीचा अतिशय अभिमान आहे की आपल्या परंपरेमध्ये महान संत जन्मास आले. महाराज सावन सिंहजी काही नवीन समाज बनविण्यासाठी नव्हते आले. त्यांनी केवळ गुरु नानक देवजी महाराज गुरु गोविंद सिंहजी महाराज, कबीर साहेबजी, संत रविदासजी व दहाही सतगुरुंनी सांगितलेली शिकवणीची आम्हांस जाणीव करून दिली.

जेव्हा एखादा महात्मा एक भ्रम आम्हा लोकांच्या मनातून काढतात, तेव्हा आपण आणखीन वीस-पंचवीस भ्रम निर्माण करतो. त्यामुळे परमात्मा आणखी एका महात्म्यास भूमंडळावर पाठवितो, तेव्हा ते महात्मा आपल्यासमोर कोणतीही नवीन माहिती ठेवत नाहीत, ते केवळ अगोदरच्या महात्म्यांची शिकवण पुन्हा आपणांस सांगतात.

महात्मा सांगतात, हे बघा बंधूनो! तुम्ही वेद-शास्त्र वाचून पहा, त्यामध्ये देखील सांगितले आहे की सर्वांचा परमात्मा एकच आहे व त्यास अंतर्यात जाऊनच प्राप्त केले जाऊ शकते. आपण त्यास आपल्या अंतर्यामध्ये प्रगट करून घेतल्यानंतरच आपणांस बाह्य जगामध्ये प्रत्येक कणा-कणामध्ये तो दिसू लागतो. असे नाही की तो परमात्मा केवळ आपल्या अंतर्यामध्येच आहे, बाह्य जगात नाही. हे सर्व विश्वच त्या परमात्म्याचे आहे. परंतु आपणांस प्रथम आपल्या शरीररूपी प्रयोगशाळेत जाऊन, त्याचा अनुभव घ्यावा लागतो.

महाराज सावन सिंहजी नेहमीच महाराज कृपाल सिंहजींना सांगत असत, ''तू अशी पार्श्वभूमी तयार कर, ज्या पार्श्वभूमीवर सर्व प्रदेशातील, सर्व जातींचे लोक, कोणत्याही भेदभावाशिवाय निर्भयतेने एकत्र बसू शकतील.'' त्यामुळे संत जेव्हा या भूमंडळावर येतात, तेव्हा ते अशीच पार्श्वभूमी बनवितात. गुरु अर्जुनदेवजी महाराज देखील म्हणतातः

***होय एकत्र मिलो मेरे भाई, दुविधा दूर करो लिव लाई ।***
***हर नामें की होवो जोड़ी, गुरुमुख बैठो सफा बिछाए ।।***

तुम्ही सर्व एकत्र येऊन बसा! तुम्ही विसरला आहात की परमात्म्याने कोणावरही लेबल लावून जन्मास घातलेले नाही. परमात्मा सर्वांचाच आहे. सर्वांचे नेत्र, नाक, कान एकसमानच आहेत. सर्वजण एकाच पद्धतीने जन्मास येतात, तसेच मृत्यूही पावतात. त्यामुळे येणारे सर्व संत आपले बाह्य जगात विखुरलेले लक्ष काढून अंतर्यात जोडतात. ते आपणांस बाह्य जगातील लोकरिती पासून दूर करीत नाहीत. विवाह ही लोकरिती असून तिचा एकच हेतू असतो की एखाद्या जोडप्याने एकत्र येऊन आपल्या जीवनास स्वर्ग बनवावे, जीवनरूपी

प्रवासास सोपे करावे, एकमेकांचा आदर–मान करावा. चार लोकांसमोर विवाह विधी करण्याचा हाच हेतू असतो की हे दोघे पती–पत्नी आहेत याची त्यांना जाण व्हावी. विवाहाशिवाय एखाद्या व्यक्तीकडे वाईट नजरेने पाहणे सुद्धा महापाप आहे. गुरु अर्जुन देवजी सांगतातः

***नैन न देखे साध नैन मुंद घालिए ।***

असे नेत्र काढून टाकावेत जे साधूंचे दर्शन करीत नाहीत. सर्व स्त्री व पुरुष एकाच प्रकारच्या मातीने बनलेले आहेत. त्यामुळे ज्याप्रमाणे एखाद्या स्त्रीकडे वाईट नजरेने पाहणे जसा गुन्हा आहे, तसाच एखाद्या पुरुषाकडेदेखील वाईट नजरेने पाहणे गुन्हा आहे, कारण विवाह आयुष्यामध्ये एकदाच होतो. विवाह ही केवळ एक लोकरिती असते. मग तुम्ही त्यामध्ये भाषणे करून कितीही अवडंबर केले तरीही काही उपयोग नाही. आपण ब्राम्हणाकडून पंचांगानुसार मुहुर्त काढून घेतो की विवाहासाठी कोणता दिवस शुभ आहे? आपण ब्राम्हणास या बाबींमध्ये तज्ञ मानतो. गुरु नानक देवजी सांगतातः

***कड कागज दस्से राव ।***
***देखो लोको ऐहो वडाण मन अंधा नाओ सुजान ।।***

नशहरे प्रांतातील जल्लण जट्ट नामक सत्संगी ध्यान–अभ्यास करीत नामाची खूप कमाई करणारा प्रेमी होता. त्यास नामस्मरणाद्वारे अंतर्यात परमगती प्राप्त झालेली होती. एकदा त्याची पत्नी त्यास म्हणाली,''हे पहा! आपली कन्या विवाहयोग्य झाली असल्याने, तिचा विवाह करणे गरजेचे आहे. तुम्ही ब्राम्हणाकडे जाऊन विवाहासाठी योग्य मुहूर्त काढून आणा की कोणता, दिवस शुभ आहे.'' जल्लण जट्ट मुहूर्त वगैरे काढण्यासाठी घरातून बाहेर पडला. वाटेत त्यास सर्वप्रथम वैद्याचे घर लागले. तेथे दुःख विलापामध्ये रडण्याचा आवाज येत होता. त्याने त्याबद्दल विचारपूस केली असता, त्यास समजले की वैद्याच्या एकुलत्या एका मुलाचा मृत्यू झाला होता. त्यावर जल्लण जट्टने विचारले, ''वैद्याने आपल्या मुलावर काही औषधोपचार केले नाहीत का?'' त्यावर त्यास उत्तर मिळाले की, ''वैद्याने केवळ स्वतःच नाही, तर

त्याच्याहूनही अधिक तज्ञ वैद्यांना बोलावून, त्याच्या मुलावर उपचार केले, परंतु तरीही मुलाचा मृत्यू झाला, काय करणार? परमेश्वराची इच्छा!'' जल्लण जट्ट तेथून बाहेर पडून पुढे निघाला. नंतर त्यास वाटेत ब्राम्हणाचे घर लागले. तेथेही रडण्याचा आवाज ऐकू येत होता. जल्लण जट्टने तेथील लोकांना विचारले, ''येथे काय झाले? सर्वजण का रडत आहेत?'' लोकांनी सांगितले, ''अगदी अलिकडेच या ब्राम्हणाने खूप खर्च करून त्याच्या मुलीचा विवाह केला होता. परंतु दुर्दैवाने ब्राम्हणाच्या जावयाचा मृत्यू होऊन, त्याची मुलगी विधवा झाली आहे. त्या दुःखामुळेच सर्वजण विलाप करीत आहेत.'' त्या लोकांना जल्लण जट्टने विचारले,''स्वतःच्या मुलीच्या विवाहासाठी ब्राम्हणाने योग्य शुभमुहूर्त शोधला नव्हता का? पंचांग पाहिले नव्हते काय?'' त्यावर ते म्हणाले की,''हे सर्व त्या ब्राम्हणाने पाहिले होते, परंतु अखेरीस जन्म-मृत्यू परमेश्वराच्या हाती असतो, आपण काय करू शकतो?''

मुहूर्त वगैरे हे गणित-शास्त्र आहे त्याची निर्मीती आपण आपल्या मन-बुद्धीच्या मदतीने केलेली आहे. ती काही परमेश्वराची देणगी नाही. हुशार मंडळी त्या शास्त्राचा फायदा त्यांच्या उदरनिर्वाहासाठी करून घेतात. आपण मात्र भ्रमात आहोत. जल्लण जट्ट तेथून मागे परतला. आपल्या घरी येऊन त्याने पाहिले ते सर्व आपल्या पत्नीस वर्णन करून सांगितले.

***वैद्या दे घर पिट्टणा ब्राह्मंण दे घर रंड ।***
***चल जल्लणा घर अपने साहा देख न सन्न ।।***

जे घडते, ते सर्व परमेश्वराच्या हातात आहे. कबीर साहेब सांगतातः

***वैद्य कहे हों ही भला दारु मेरे वस ।***
***ऐह ते वस्तु गोपाल की जब भावे ले खस ।।***

औषधोपचार केल्याने आजारग्रस्त शरीरास आराम मिळतो. त्यामुळे आजारपणात उपचार करणे, डॉक्टरचा सल्ला घेणे चांगले असते, संत त्यास चुकीचे आहे असे म्हणत नाहीत. परंतु डॉक्टरकडे मृत्यू न येण्याचे औषध असते असा जर तुम्ही विचार केलात, तर ते मात्र चुकीचे आहे.

संत आपणांस कधीच सांगत नाहीत की तुम्ही विवाह करू नका, विवाह करणे गुन्हा आहे. खरे तर बाह्य जग हे आपल्या अंतरातील विश्वाचे प्रतिबिंब आहे. त्यानुसार आपला आत्मा वधु असून शब्दध्वनी तिचा वर आहे. जोपर्यंत आत्मारूपी वधुचे शब्दध्वनीरूपी वराशी विवाह होत नाही, तोपर्यंत वरास आपली वधु कोण आहे, हे कसे कळेल? धनाची कमाई करून या वधूचे पालनपोषण कसे करावे, याचे त्या वरास कसे आकलन होईल? या सर्व गोष्टींची चिंता पुरुषास असते. विवाह–बंधनाचे नाते अतिशय पवित्र असते.

परंतु मला सांगण्यास अतिशय वाईट वाटते की आजकाल आपण हे नाते विस्कटून टाकले आहे. आपल्या मुलींना अशी शिकवण दिली जाते की जोपर्यंत ती तिच्या पतीची निंदा करीत नाही तोपर्यंत तिला, तसेच जोपर्यंत पती पत्नीची निंदा करीत नाही तोपर्यंत तिच्या पतीलादेखील अन्न स्वादीष्ट लागत नाही. हे काही पती–पत्नीचे खरे नाते नाही.

पती–पत्नीचे संबंध, विवाहाचे बंधन हे अतिशय पवित्र बंधन आहे. त्यामुळे ते बंधन टिकवणे हे त्या दोघांचेही कर्तव्य आहे. संत मर्यादेचे पालन करीत आपणांस समजावतात की अंतर्यातील आत्मा व ध्वनीचे नाते हे खरे नाते असून बाह्य जगातील पती–पत्नीचे शारिरीक नाते हे त्याचे प्रतीरूप आहे. तुम्ही जर या शारिरीक बंधनास पक्के बंधन मानले नाहीत, तर आंतरिक नाते कसे बरे निभावणार?

महाराज कृपाल सांगत असत, ''तुम्ही ज्यांना प्रत्यक्षात पाहता, त्यांच्यावर तुमचे प्रेम नाही तर तुम्ही अंतर्यात जाऊन आत्मा व ध्वनी यांचे पती–पत्नीचे नाते कसे बरे निभावाल? असे असताना तुम्ही शब्दरूपी सतगुरुंवर कसे प्रेम करू शकाल? प्रथम तुम्हांस या बाह्यजगातच त्याचे प्रात्यक्षित करावे लागेल.''

अलिकडेच सॉंपला येथे झालेल्या कार्यक्रमात एक इंग्रज प्रेमीने मला प्रश्न विचारला होता. हे लोक हिंदुस्थानी प्रेमींप्रमाणे बाह्य जगाबद्दल प्रश्न विचारत नाहीत. त्यांचे सगळे प्रश्न आंतरिक गोष्टींबद्दलच असतात.

त्याने मला विचारले, ''आत्मा अंतरात कशारितीने जाते? तेथे सतगुरुंचे अस्तीत्व कसे जाणवते?'' मी त्या दिवशी आश्रमाच्या गच्चीमध्ये उभा होतो. आपल्या संगतमध्ये मायकल व सॅली नामक सत्संगी पती-पत्नी आहेत. त्या दोहोंचेही आपआपसामध्ये खूप प्रेम आहे. ते दोघे त्यावेळी आश्रमाच्या कंपाउंडच्या भिंती जवळून चालत-चालत फिरत होते. मायकल उंच असून सॅली त्याच्या तुलनेने बुटकी आहे. त्यामुळे मायकल वेगाने चालत होता, तर सॅलीस त्याच्या बरोबरीने चालण्यासाठी धावावे लागत होते.

मी त्या प्रेमीस सांगितले की ज्याप्रमाणे मायकल व सॅली एकमेकांसोबत पुढे-मागे चालत होते, सॅलीस धावावे लागत असूनही ती मायकल बरोबरच चालत होती. अंतर्यात देखील असेच शब्दरूपी सतगुरु पुढे असतात व आत्मा त्यांच्या मागोमाग असतो. जोपर्यंत या वधुस शब्दाशी गाठ घालून देणारे सतगुरु भेटत नाहीत, तोपर्यंत आपण सांसारिक नाते कमी प्रमाणातच निभावतो, त्यासाठी आपल्या आई-वडिलांना प्रयत्न करावे लागतात.

मला आनंद वाटतो की मागील वेळेस इंग्लंडवासी मताई साहेब व हैप्पीजींची नात यांचा **आदर्श विवाह** झाला होता. आज होणारा विवाहदेखील त्या विवाहाप्रमाणेच **आदर्श विवाह** आहे. याविवाहात कोणत्याही प्रकारचा हुंडा घेतला अथवा दिला गेलेला नाही व हुंड्यासाठी अमुक रक्कमेची मागणी वा तसा आग्रहही नाही. कारण माझ्याकडे अनेकजण येतात ते म्हणतात आम्हाला हुंडा म्हणून अमुक लाख रूपये हवेत वा आम्ही हुंडा म्हणून अमुक लाख रुपये देणार आहोत. ज्याप्रमाणे बाजारामध्ये बैलाचा सौदा होतो, तसेच मुलांची विक्री होते. त्यामुळे बिचाऱ्या वधूपक्षास त्यानुसार वागावे लागते. प्रियजनहो! एखाद्याच्या देण्याने घेणाऱ्याचे कधीच समाधान होत नाही. म्हणून तुम्हांस जे काही हवे आहे, ते परमेश्वराकडे मागा, जो देऊन पश्चाताप करीत नाही. ऐहीक वस्तूंची मागणी वधूपक्षाकडे करून, आपण आपल्या घराचे रूपांतर नरकामध्ये करीत असतो. कबीर साहेब सांगतातः

***मान गया आदर गया, नैनन गया स्नेह ।***
***ये तीनों ओदां गए, जद आख्या कुछ दे ।***



तुम्ही जर एखाद्या घरी जाऊन पैसे अथवा इतर गोष्टींची मागणी केल्यास तुमचा तेथे मान-सन्मान रहात नाही. त्यामुळे तुमच्याबद्दलचा मान, आदर व त्यांच्या नजरेतील स्नेह नाहीसा होतो.

मला आनंद होत आहे की हे (चोपडा-सरदाना परिवाराचे) नाते जुळण्यासाठी काही अधिक वेळ लागला नाही. कारण विवाह-संयोग अतिशय महत्वाचा असतो. मागील आदर्श विवाह झाल्यावर आपल्या चोपडा साहेबांच्या हृदयात देखील विचार आला की आपणांस एखादे योग्य स्थळ मिळाल्यास मी हुंड्यासाठी लालच करणार नाही. मी म्हणालो,''ठिक आहे,आपण पाहू या!''

एवढी चर्चा करून चोपडा गेल्यावर, नंतर मुलीकडील माणसे माझ्याकडे आली, ते म्हणाले या मुलीची काळजी तुम्हासच आहे. त्यांनी सुरेशबद्दल माझ्याकडे विचारपूस केली की, तुमच्या दृष्टिकोनातून तो कसा आहे? मी म्हणालो, ''तो लहानपणी शाळेत जाताना मला नमस्कार करीत असे, परंतु ज्यादिवशी शाळेस जाणार नसेल त्यादिवशी मात्र नमस्कार करीत नसे.'' मुलगा लहानपणापासून हुशार आहे, चांगला आहे.''

त्यावेळी चोपडास बोलावून मी विचारले की,''तुला काय हवे? तुझा विचार काय आहे?'' मला सांगण्यास आनंद होतो की चोपडा मला दिलेल्या वचनावर ठाम राहिला आहे. मला विश्वास आहे, दोन्ही परिवार आपआपसातील प्रेम जीवनामध्ये कायम ठेवतील व संगतशीदेखील मिळून मिसळून राहतील.

**आवहु भैणे गलि मिलह, अंकि सहेलड़ीआह ।।**

मी अगोदरच सांगितले आहे की अंतर्यात अस्सल (सत्य) आहे व बाह्य जगात त्याची नक्कल आहे. बाह्य जगात जे काही रितीरिवाज आहेत ते सर्व अंतर्यात आहेत. सर्वांच्या कर्मांचा हिशोब ठेवणाऱ्या देवास गुरु नानक देवजी महाराज काही ठिकाणी धर्मराज म्हणतात तर काही ठिकाणी मुन्सिफ देखील म्हणतात. फरक एवढाच असतो की अंतर्यात होणारा न्याय सत्यानुसारच होतो. तेथे कोणाची शिफारस चालत नाही.

गुरु नानक देवजी महाराज मक्का येथे गेले असता, त्यांना प्रश्न विचारला गेला की,''ज्यांनी सतगुरु धारण केले आहे, त्यांना पाप करण्याची सुट आहे काय?'' त्यांनी प्रेमाने उत्तर दिले, तुम्ही तुमचा पवित्र ग्रंथ कुराण वाचून पहा, मोहम्मद साहेब कशातऱ्हेने स्वकष्टाने कमावून स्वत:चा उदरनिर्वाह करीत असत, ते मालाच्या खरेदी-विक्रीचे काम करीत असत. एक सत्संगी चोरी करुन त्यांच्याकडे आला, म्हणून त्यास त्यांनी शिक्षा दिली. जे लोक केवळ स्वार्थी असतात, त्यांना अशा गोष्टीचे वाईट वाटते. त्यावेळी मोहम्मद साहेबांचा एक मुसलमान प्रेमी त्यांच्या शेजारीच उभा होता. तो म्हणाला, ''मक्क्यामध्ये अगोदरच तुमचे अनेक विरोधी आहेत. तुम्ही जर यास शिक्षा दिलीत तर हा देखील त्या विरोधकांमध्ये सामील होईल.''

मोहम्मद साहेब त्यावर हसून म्हणाले की, हा त्या विरोधकांमध्ये सामील होईल याची मला बिलकुल चिंता नाही. सत्याचा प्रचार करणे माझे कर्तव्य आहे. चोरी करण्याऱ्या मुसलमानांचा मी गुरु नाही. मी तर सद्गुणी मुसलमान बनविण्यासाठी आलेलो आहे. या कार्यामध्ये माझा कोणी विरोध करेल वा मला शाबासकी देईल याचा मी विचार करीत नाही.

***पंडित भेख पेट के मारे वे सन्तन पर करते तान ।***
***हितकर सन्त उन्हें समझावें वे माने नहीं माने आन ।***
***उनको चाह मान और धन की परमार्थ से खाली जान ।।***

जेव्हा संत सत्याचा प्रचार करीत असतात, तेव्हा ज्या लोकांचा स्वार्थ साधला जात नाही, ज्यांच्या मिळकतीवर त्याचा परिणाम होतो, त्यांना ते आवडत नाही. पंडीत, ब्राम्हण, पादरी यांचे कधीच आपआपसात पटत नाही. परंतु जेव्हा संतांची निंदा करावयाची असेल, तेव्हा ते सर्वजण एकत्र येतात.

तुम्ही कधीही कोणाला तुमची प्रशंसा करण्याची संधी देऊ नका. कारण ही प्रशंसाच आपणास ध्यान–अभ्यासापासून दुरावते, तिच्यामुळेच आपण गर्वाने फुगतो. त्यामुळे आपण आपल्या अंतरात ढुंकूनही पाहत नाही. गुरु नानक देवजी महाराज म्हणतातः

***नानक ते नर असल खर जे बिन गुण गरब करन्त ।***

खरे तर ज्या लोकांमध्ये काही विशेष गुण नसतानाही, इतर लोक जर प्रशंसा करीत असतील, तर त्या प्रशंसेने फुगणारे लोकच गाढव असतात. त्यांना वाटू लागते की त्यांच्यामध्ये खरोखरच सदगुणांचा साठा आहे. गुरु नानक देवजी महाराज सांगतातः

***हक पराया नानका उस सूअर उस गाय ।***
***गुरु पीर हामां तां भरे जे मुर्दार न खाए ।।***

मी या अगोदर राहत असलेल्या गावातील एक घटना नेहमी सांगतो. ज्ञानी नावाच्या गृहस्थास येथे बसलेले बरेचजण ओळखतात. त्याचा जावई देखील येथे संगतमध्ये बसलेला आहे. एकदा पाच मुरब्बे क्षेत्र असलेल्या जमिनीत आम्ही हरभऱ्याच्या भाजीचे पीक लावले होते. शेजारीच एका गरीब शेतकऱ्याची चार–पाच किल्ले जमीन होती. मी ज्ञानीस म्हणालो हरबऱ्याची भाजी छान लागलेली आहे, तेव्हा ती तू तोडून आण. परंतु स्वतःच्या जमिनीतून भाजी तोडण्याऐवजी ज्ञानी शेजारच्या त्या गरीब शेतकऱ्याच्या जमिनीतील भाजी तोडू लागला. मी ज्ञानीस म्हणालो, ‘‘ज्ञानीजी! ही अतिशय चुकीची गोष्ट आहे की तू आपल्या दिडशे किल्ले क्षेत्र असलेल्या जमिनीतून

भाजी तोडण्याऐवजी त्या गरीब शेतकऱ्याच्या चार पाच किल्ले क्षेत्र असलेल्या जमिनीतील भाजी तोडत आहेस.'' त्यावर ज्ञानी म्हणाला,''दुसऱ्याच्या जमिनीतील क्षुल्लक भाजी तोडण्यास चोरी थोडीच म्हणतात?'' मी त्यास म्हणालो की, ''परमेश्वराने आपल्या शेतात खूप काही दिलेले आहे. तुला जाणवत नाही की तो परमेश्वर अंतरात तुझा धिक्कार करीत आहे.''

गुरु नानक देवजी महाराज म्हणतात की आपण लहान–लहान गोष्टींवर लक्ष देत नाही. हिंदू धार्मिकास दुसऱ्यांच्या हक्काचे अन्न खाणे हे गोमांस खाण्यासमान तर मुसलमानास तसे करणे म्हणजे डुकराचे मांस खाण्यासमान असते. जर सतगुरु–पीर–पैगंबर यांच्या शिकवणुकीनुसार आपण जीवन जगत असलो, तरच ते आपल्या मुक्तीची हमी देतात. कबीर साहेब सांगतातः

***गुरु विचारा क्या करे जे सिक्खां में चूक ।***
***अंधे एक न लग्गी ज्यों बाँस बजाई फूँक ।।***

मी अगोदरच सांगितले आहे की अंतर्यामध्ये आपला आत्मा वधु असून शब्दध्वनी तिचा वर आहे. गुरु नानक देवजी महाराज त्यांच्या वाणीमध्ये या बाह्य जगाचे वर्णन करतात की नव विवाहीत वधू आपल्या मैत्रिणींना म्हणते, ''या भगीनींनो! आपण आपल्या पतीविषयी चर्चा करू या.'' कारण विवाहीत असल्या कारणाने त्यांनादेखील पती लाभलेला असतो.

याचप्रमाणे जेव्हा सत्संगी आत्मा एकत्र येतात, तेव्हा ते देखील परमात्म्या विषयी, अध्यात्मा विषयी चर्चा करतात, कारण त्या सर्वांना नाम लाभलेले असते. ते आपआपसामध्ये चर्चा करतात की तू दररोज नित्यनेमाने ध्यान–अभ्यास करतोस काय? ध्यान–अभ्यासात कधी खाडा तर करीत नाहीस ना? ध्यानात आनंद प्राप्त होतोय का? म्हणूनच आपली सत्संगींशी भेट झाल्यावर आपण खुष होतो, कारण तो ध्यान–अभ्यासाबद्दलच काही चर्चा करेल. त्यामुळे आपल्यासोबत सचखंडास जाणारे सत्संगी आत्मेच आपले खरे मित्र आहेत. आपल्या इतर मित्रांचे प्रेम या बाह्य जगापर्यंतच मर्यादित असते.

**मिलि कै करह कहाणीआ संम्रथ कंत कीआह ।।**

आपल्या मनुष्य शरीराची मर्यादा या बाह्य जगापुरतीच आहे. परंतु गुरु साहेब अंतर्यातून आत्म्यांना इशारा करतात की या, आपण एकत्र येऊन आपल्या समर्थ पतीबद्दल, परमात्म्याविषयी चर्चा करू. कारण तो सामर्थ्यवान असल्यामुळे त्याच्या मर्जीनुसार तो काहीही करू शकतो. आपला जन्म–मृत्यू तसेच मान–सन्मान त्याच्याच हातात आहे. तो जेव्हा आपल्या अंतर्यात प्रगट होतो, तेव्हा तो आपल्या भूत–भविष्यामधील चुकांवर पडदा टाकतो.

**साचे साहिब सभि गुण, अउगण सभि असाह ।।**

अंतर्यात जाणारा आत्मा आपल्या पतीपरमेश्वराचे वर्णन करतो की तो आपला पती गुणवान आहे. परंतु आपण अवगुणांनी भरलेला असल्याने पतीपरमात्मा आपल्यावर प्रसन्न होत नाही. त्यामुळे जोपर्यंत आपण आपल्या अवगुणांचा त्याग करीत नाही, तोपर्यंत आपला सामर्थ्यवान पती आपल्यावर कसा बरे प्रसन्न होईल?

**करता सभु को तेरै जोरि ।।**
**एकु सबदु बीचारीऐ जा तू ता किआ होरि ।।**

विवाहापूर्वी मुलगी तिच्या बाहुली–भातुकलीच्या वस्तूंशी खेळते. तिच्या बहीण–भावावर प्रेम करत असते. त्यावेळी जर तिला सांगितले की तू या खेळण्यांवरील व आईवडिलांवर असलेले प्रेम, तसेच तुझ्या सवंगड्यांवरील प्रेमाचा त्याग कर, तर तिने आयुष्यभर जर तसे करण्याचा प्रयत्न केला तरीही ती यशस्वी होणार नाही. परंतु तिचे आई–वडील मात्र ही मुलगी परक्याची अमानत आहे, हे लक्षात ठेऊनच तिचे पालन–पोषण करीत असतात. एके दिवशी तिची पाठवणूक करावयाची आहे याची त्यांना जाणीव असते.

विवाह झाल्यावर मात्र त्या मुलीस तिच्या सवंगड्यावरील, भाऊ–बहिणींवरील प्रेमाचा त्याग करण्यास सांगण्याची गरज पडत नाही. पतीशी झालेल्या मिलापामुळे तिला इतर सर्व बाबींचा विसर पडतो. हळूहळू सासरबद्दल प्रेम निर्माण होते, मग पूर्वीच्या सवंगड्यांची कोण आठवण ठेवते, भातुकलीचा खेळ कोण सांभाळून ठेवतो?

याचप्रमाणे संत सतगुरुंना जाणीव असते की आपण जीव विषय–विकारांमध्ये गुंतुन पडलेलो आहोत. त्यामुळे ते अंतरातूनच आपणांस नामाशी जोडतात. जे लोक ध्यान–अभ्यास व नामस्मरणात प्रगती करू लागतात, त्यांचे मन आपोआपच विषय–विकारांपासून दुरावू लागते.

कोडा राक्षस माणसांना खात असे. परंतु गुरु नानक देवजी महाराजांनी त्याला नामाचे रहस्य समजावले असता तो महात्मा झाला. कोडा राक्षस गुरु नानक देवजी महाराजजींचा प्रतिनीधी बनला होता, गुरु नानक देवजींनी त्यास वर दिला, ''ज्यास तू नाम देशील त्यास मी मुक्ती देईन.''

अशा प्रकारचे अनेक लोक महाराज सावन सिंहजी आणि महाराज कृपाल सिंहजींच्या चरणांशी आल्यानंतर सद्गृहस्थ झालेले माझ्या पाहण्यात आले होते. सर्व संतांकडे अशा तऱ्हेचे अनेक लोक येतात व त्यानंतर पाप करणे सोडून देतात. जसजसे आपण पर्वतावर चढू लागतो, तसतसा आपणांस गारवा जाणवू लागतो, त्याचप्रमाणे जसजसे नामाचा जप करीत करीत आपण तिसऱ्या तिळावर एकाग्र होऊ लागतो, आपले या बाह्य जगाचे आकर्षण कमीकमी होऊ लागते, ते नाहीसे होते.

विवाहानंतर पत्नी जेव्हा तिच्या पतीचा शेला आधारासाठी घट्ट पकडते, तेव्हा त्या पतीस जाणीव होते की यापुढे त्याच्या पत्नीच्या अब्रुचा रक्षणकर्ता तोच आहे, त्याचप्रमाणे जेव्हा आपण सतगुरुंचा आसरा घेतो, त्यांच्या उपदेशानुसार आपले जीवन व्यतीत करू लागतो, तेव्हा त्यांना आपली चिंता असते, ते आपली काळजी घेतात. परंतु त्याऐवजी आपण जर सतगुरुंची निंदा करू लागलो, तर त्यामध्ये त्यांचा काय दोष?

***गुरु बेचारा क्या करे जे सिक्खन में चूक ।***
***अंधे एक न लग्गी ज्यों बाँस बजाई फूँक ।।***

सतगुरु जेव्हा नामदान देतात, तेव्हा आत्मा बाह्य जगात पसरलेले सर्व लक्ष तेथून हटवून शब्दाशी तो एकजीव होऊ लागतो. नामदानापूर्वी पस्तीसशे देवांना आपण परमेश्वर मानत असतो. आपण कधी दगडाची, कधी पाण्याची,

तर कधी कबरींची पूजा करतो. परंतु नामदान प्राप्त झाल्यानंतरही आपण पूर्वीप्रमाणेच पुजा-अर्चा करीत राहिल्यास ते कृत्य एखाद्या व्यभिचारी स्त्रिने केलेल्या व्यभिचारासमान असते.

**जाइ पुछहु सोहागणी तुसी राविआ किनी गुणी ।।**
***सहज संतोखि सीगारीआ, मिठा बोलणी ।।***

ज्या आत्म्यांनी आपल्या पती-परमात्म्यास प्रसन्न करून घेतलेले असते, त्या आत्म्यांना विचारा की तुम्ही परमात्म्यास कसे प्रसन्न करून घेतले? ते आत्मा तुम्हांस सांगतील की त्यांना परमात्म्याने जे काही दिले, त्यावरच त्यांनी समाधान मानले. परमात्म्याने जरी त्यांना उपवाशी ठेवले तरी ते सबुरी ठेवतात. जर परमात्म्याने त्यांना पोटभरून अन्न दिले तर ते त्यास परमात्म्याची दया, त्याचे उपकार मानतात. त्यांना काही प्राप्त झाल्यास, त्याबद्दल त्यांना आनंद होत नाही. तसेच त्यांच्याजवळील काही गमावल्यास त्यांना दुःखही होत नाही. आपण असे तोंडाने केवळ बोलतो, तसे वास्तवात घडल्यास ते सहन करणे खूप अवघड असते.

हेच गुण आपणांमध्ये गृहस्थावस्थेमध्ये असणे देखील गरजेचे आहे. नाहीतर घरात स्वयंपाकासाठी धान्यदेखील नसले तरी घरातील स्त्रीने हट्ट धरावा की मला इतके ड्रेस हवेत.

मला शहरवासी, खेडूत, परदेशी, श्रीमंत तसेच गरीब या सर्वांना भेटण्याची संधी मिळते. अनेक मुलींकडे वीस-वीस साड्या, ड्रेस असतात, परंतु त्या काय विचार करतात? मला माझ्या सर्व साड्या तसेच सर्व ड्रेस घातलेले आजुबाजूच्या लोकांनी पाहिलेले आहे. आता असा एकही ड्रेस बाकी नाही, जो घातलेला लोकांनी पाहिलेला नाही. तिच्या नोकरी करणाऱ्या पतीचा पगार कमी असल्यास वा तिचा पती शेतकरी असल्यास व त्याचे उत्पन्न कमी असल्यास तो म्हणतो की आपण राहत असलेला परिसर सोडून, दुसऱ्या एखाद्या परिसरामध्ये राहण्यासाठी जाऊया, जिथे तुझे कपडे पाहिलेले नसतील. प्रियजनहो! अशारितीने पत्नी तिच्या पतीस खुष करू शकेल काय?

मी सीमाप्रांतात देखील पूर्वी राहत होतो. तेथील पठाणांच्या पत्नीने त्यांच्या पतीस हैराण करून सोडले होते की तुम्ही चोरी करून वा दरोडा घालून पैसे आणावेत, परंतु आमची कपड्यांची हौस जरूर पूर्ण करावी. इतरांशी मधुर भाष्य केले, स्नेह–संबंध ठेवले तरच आपण परमार्थात यशस्वी होऊ. परमात्म्याने जे काही आपणांस दिले आहे, त्यातच समाधान मानावे.

मी माझ्या बालपणीची गोष्ट सांगत असतो की, पंजाबमध्ये आमच्या शेतात मोहरीचे (राईचे) खूप पीक येत असे. एकदा असेच मोहरीचे (राईचे) शेत पिकून तयार झाले असता, परमात्म्याच्या मर्जीने गारपीट झाली (गारांचा वर्षाव झाला), सर्वांचे हृदय हळहळले. माझ्या काकांनी तर झाडास लटकून फाशी घेतली. मी त्यावेळी लहान असूनही असा विचार केला की आयुष्यात कितीतरी वेळा खूप पीक येते, तसेच पिकाचे कधी नुकसानही होते.

याचप्रमाणे मला भेटण्यासाठी अनेकदा व्यापारी देखील येतात. ते जेव्हा त्यांना व्यापारात झालेल्या तोट्याविषयी माझ्याशी चर्चा करतात तेव्हा त्यांना मी सांगतो, ''हे बघ प्रिय बांधवा! तू जेव्हा या जगात जन्मलास, तेव्हा तू केवळ मांसाच्या गोळ्यासमानच होतास. तुझ्याकडे जे काही आहे, ते तुला येथेच प्राप्त झाले आहे. तू जर धैर्य राखलेस, तर यापुढेही तुला ते मिळणार नाही काय?'' परंतु अशावेळी आपण परमात्म्यात दोष काढतो. त्यास दोषी ठरवितो. कबीर साहेब सांगतातः

***गुरु बतावे साध को, साध कहे गुरु पूज ।***

जो मनुष्य ध्यान–अभ्यासाची साधना करून आपल्या दहाव्या द्वाराशी पोहचलेला आहे, तोच खरा साधू आहे. त्या दहाव्या द्वाराशी पोहचल्यावरच आपल्या सर्व आशा सुन्न होतात व आपण सन्याशी बनतो. त्यास साधू वा सन्याशी काहीही म्हणा. परंतु आपण तेथे न पोहचताच, आपणांस सन्याशी, साधू बनण्याचा अहंकार होतो. म्हणूनच आपण आपल्या आत्म्यावरील तिन्ही पडदे दूर सारून दहाव्या द्वाराशी पोहचावे. सतगुरुंनी जो आपणांस शब्द–नामाचा मार्ग दार्शविला आहे, त्या मार्गाने चालावे, नामाचा जप करावा.

**पिरु रीसालू ता मिलै, जा गुर का सबदु सुणी ।।**

परमात्म्याने तुला शब्दाशी जोडले आहे, तो शब्द जर तू ऐकलास, त्याच्या वचनानुसार चाललास तरच परमात्मा तुझ्या अंतर्यात प्रगट होईल.

**केतीआ तेरीआ कुदरती, केवड तेरी दाति ।।**
**केते तेरे जीअ जंत, सिफति करहि दिनु राति ।।**

आता आत्मा, तिच्या पती परमात्म्यास म्हणते, ''मी तुझे काय गुणगान करू? तू किती मला दान दिले आहेस? तू ज्याच्यावर दया करतोस, त्यास कोणत्याही गोष्टीची कमतरता राहू देत नाहीस. त्यास काय द्यायचे, याची तुलाच काळजी आहे. या विश्वात किती जीव-जंतू आहेत ज्यांचा उदरनिर्वाह तू करीत आहेस.''

प्रियजनहो! मनुष्य किती भांडार साठवतो, संपत्ती गोळा करतो, किती घरे बांधतो? किती चिंता करीत असतो? परंतु पशु-पक्षी कधी अन्न धान्याचा व इतर वस्तूंचा साठा करतात काय? ते तो साठा कोठे ठेवतील? त्यांच्याकडे केवळ त्यांची चोचच असते. परंतु परमात्मा त्यांचादेखील उदरनिर्वाह करतो. दगडाच्या गर्भामध्ये किडा असतो, ज्यास बाहेर पडण्यासाठी काहीच मार्ग नसतो. परंतु परमात्मा त्यास तेथेही अन्नपाणी देतो. आपण जेव्हा दहाव्या द्वारी पोहचतो, तेव्हाच आपणांस ज्ञान होते की पती-परमात्म्याचे विश्व किती विशाल आहे. ज्या मुनष्याच्या अंतर्यामध्ये तो प्रगट होतो तो मनुष्य त्याचे मुल्य देऊ शकत नाही.

**केते तेरे रूप रंग, केते जाति अजाति ।।**
**सचु मिलै सचु उपजै, सच महि साचि समाइ ।।**

परमेश्वराने कशाप्रकारची रचना या विश्वाची केलेली आहे? किती निरनिराळी रूपे आहेत? दोन मांजरींच्या चेहऱ्यामध्ये काही साम्य नसते, तसेच एक मनुष्याचा चेहरा दुसऱ्या मनुष्याच्या चेहऱ्याशी तंतोतंत मिळत नाही. तुम्ही शेकडो-हजारो माणसांच्या हातांच्या रेषांची तुलना करा, त्या एकमेकांशी

जुळत नाहीत. लाखो करोडोंमध्ये एखाद्याच हाताच्या रेषांमध्ये कदाचित थोडेफार साम्य आढळते, नाहीतर त्यादेखील एकमेकांशी मेळ खात नाहीत. पशु–पक्षांमध्येही साम्य नसते. तसेच मनुष्या–मनुष्यामध्ये देखील साम्य नसते.

ज्यांच्या अंतर्यामध्ये परमात्मा प्रगट होतो, तेच लोक त्याचे रूप–रंग पाहू शकतात. अशावेळी ते म्हणतात, हे परमात्मा! तुझी किती निरनिराळी रूपे आहेत! कशातऱ्हेने तू सर्वांना बनविले आहेस, ज्यांचे रुप एकमेकांशी मेळ खात नाही. तू किती जातीच्या लोकांच्या अंतरात बसलेला आहेस व तरीही तू अजात आहेस. कोणत्याही खास एखाद्या जातीशी तुझी बांधिलकी नाही. असे नाही की तुला केवळ हिंदूच भेटू शकतात व मुसलमान भेटू शकत नाहीत.

***जाति पाति पूछे न कोय हरि को भजे सो हरि का होय ।***

**सुरति होवै पति ऊगवै, गुर बचनी भउ खाइ ।**
**नानक सचा पातिसाहु, आपे लए मिलाइ ।।**

गुरु नानक देवजींनी या ऐहीक नात्यांची अंतर्यातील नात्यांशी तुलना करून सांगितले आहे की, आत्मा पत्नी असून शब्द तिचा पती आहे. सतगुरु या दोघांना जोडणारी एक कडी आहे. आपल्या व परमात्म्याच्या दरम्यान दोघांना जोडणारा शब्द एखाद्या कडीचे काम करतो. जे लोक संत–सतगुरुंच्या शिकवणुकीनुसार आपल्या जीवनास घडवितात, ते याच आयुष्यात त्यांची आध्यात्मिक प्रगती साधतात. हे सर्व परमात्म्याच्या मर्जीनुसारच घडत असते. 'संत कोठे फी आकारत आहेत? चला! आपण आपल्या मर्जीनुसार नाम प्राप्त करूया!' असा विचार मनात येतच नाही. नाम प्राप्त करण्याची अंतरात इच्छाच उत्पन्न होणार नाही, मग भले तुम्ही दररोज त्यांच्यासोबत फिरत रहा.

मी महाराज सावन सिंहजींची, सच्चे पातशहांची एक घटना नेहमी सांगत असतो. त्यांचा एक किशन सिंह नावाचा मित्र होता. तो दररोज पाच–सहा तास गुरु–वाणीचे पठण करीत असे. महाराज सावन सिंहजींना असे वाटले की हा चांगला प्रेमी आहे, यास बाबा जयमल सिंहजींद्वारा नामदान दिले जावे.

महाराज सावन सिंहजी नोकरी करीत होते त्यामुळे त्यांना कामा निमित्त बाहेर जाणे गरजेचे होते. बाहेर जाताना त्यांनी बाबाजींना सांगितले की,''किशन सिंह नावाचा एक प्रेमी येथे येईल, त्यास आपण कृपया नामदान द्यावे.'' बाबाजी म्हणाले, ''ठीक आहे बंधू!'' किशन सिंह तेथे आला व बाबा जयमल सिंहजीं बरोबर वाणीबद्दल गप्पा मारू लागला.

तुम्हांस कल्पना आहे की संतांना जर कोणी काही ऐकवू लागले, तर ते शांतपणे ऐकून घेतात. आपण विचार करतो की सत्संगामध्ये संतवाणी तर सुनावतात, जिची आपणांस माहिती आहेच. प्रियजनहो! आपणांस हे माहित नसते की संतांनी अंतर्यातून हे सर्व प्रत्यक्ष पाहिलेले असते, ते निरळेच असतात. एखाद्या माणसास एका प्रांताचा नकाशा संपूर्ण तोंडपाठ असतो, परंतु त्याने तो प्रांत स्वतः आपल्या नेत्रांनी पाहिलेला नसतो.

मी नेहमी सांगतो की एक मनुष्य भौगोलिक विद्येचा तज्ञ असतो. त्यामुळे सर्व देशाची माहिती तो एका मिनीटामध्ये सांगू शकतो. परंतु ज्या मनुष्याने ते देश स्वतःच्या नेत्रांनी पाहिले आहेत, तोच मनुष्य खरा जाणकार म्हणून गणला जातो. बाबा बिशनदास जैतो गावाजवळ राहत असत, ज्याच्या शेजारीच कसूर प्रांत होता. जेव्हा लोक त्यांच्याकडे येऊन अशारितीने त्यांच्या ज्ञानाचे प्रदर्शन करीत, तेव्हा बाबा बिशनदासजी म्हणतः

***ऐवे झूठियां मिश्र दियां देवें खबरा,***
***देखया जाके शहर लाहौर है ना ।***

ते म्हणत,''तू शेजारीच असलेले लाहोर शहर पाहिलेले नाहीस, तरीही तू येथून खूप दूरवर असलेल्या अनेक शहरांच्या बातम्या सांगत आहेस.'' याचप्रमाणे आपण मन–इंद्रियांचे गुलाम असूनही इतरांना गोष्टी सांगत–सांगत समजावण्याचा प्रयत्न करतो की तुम्ही अमुक रितीने आचरण केल्यास तुम्हास परमेश्वर प्राप्त होईल. त्यास तुम्ही विचारा की बंधू तू ध्यान–अभ्यास करीत अंतर्यातून कोठपर्यंत उन्नती साधली आहेस? तुला शांती प्राप्त झालेली आहे काय? त्याचा तर प्रश्नच येत नाही. तो विचारतो की शांती कोण आहे?

आपले मस्तानाजी येथे बसले आहेत, त्यांना रायसिंगनगर येथे एक महात्मा भेटले होते. त्याच्यासोबत हुशार म्हणून गणले जाणारी आणखीन चार–पाच माणसे होती. मस्तानाजीने त्या महात्म्यास विचारले, ''बाबा शांती राख.'' त्यावर तो महात्मा म्हणाला की,''शांती कोणत्या कुत्रीचे नाव आहे?'' प्रियजनहो! अशावेळी काय करावे? लोक केवळ साधूचा वेष धारण करतात. परंतु ध्यान–अभ्यास करून अंतर्यात गेल्यावरच शांती लाभते.

गुरु नानक देवजी महाराज म्हणतात की परमात्म्याने सर्वकाही त्याच्या ताब्यात ठेवलेले आहे. जेव्हा परमात्म्याची आपणावर कृपादृष्टी करण्याची इच्छा होईल, तेव्हाच तो आपणांस एखाद्या महात्म्याच्या सानिध्यामध्ये नेईल, तेव्हाच त्या महात्म्यावर आपण विश्वास ठेवू, तेव्हाच आपणांस नामदान घेण्याची इच्छा होईल. नाहीतर तुम्ही दररोज अशा साधूच्या सानिध्यामध्ये बसूनही तुम्हांस नामदान प्राप्त करण्याची इच्छा होणार नाही.

***जिन मस्तक धुरो हरि लिखया तिन सतगुरु मिलया ।***
***अज्ञान अंधेरा कटया ज्ञान घट बलया ।।***
***हर लद्धा रतन पदार्थों फिर बोहड़ न चलया ।***
***नानक नाम अराध अराध हर मिलया ।।***

गुरु नानक देवजी महाराज आपणांस अतिशय प्रेमाने समजावतात की परमेश्वराची आराधना केली तरच आपण परमार्थामध्ये यशस्वी होतो. त्यामुळे आपलेदेखील कर्तव्य आहे की गुरु नानक देवजी महाराजजींच्या शिकवणुकीनुसार वागून आपले जीवन सफल करावे.

## वैसाखि धीरनि किउ वाढीआ जिना प्रेम बिछोहु ।।

आपल्या हिंदुस्थानातील संत महात्मे, कवी मंडळी त्यांच्या विरहाचे वर्णन आठ वारां किंवा बारह माहा द्वारे वर्णन करतात की त्यांना परमात्म्याबद्दल किती आपुलकी, किती प्रेम आहे? त्यांना जर परमात्मा लाभला नसता तर त्यांची काय अवस्था झाली असती? परंतु गुरुसाहेबांच्या वाणीमध्ये व इतरांच्या बारह माहामध्ये हा फरक आहे की गुरुसाहेबांनी परमार्थाची सांगड मनुष्य



जन्माशी घातलेली आहे. ते म्हणतात, मनुष्यजन्म अतिशय अनमोल असून, आपण तो गमावल्यास, तो पुन्हा आपणांस लाभणार नाही. आपण त्या मनुष्य जन्मामध्ये काय करावयास हवे? प्रत्येक महिन्याचा हाच संदेश आहे. मी सांगितले होते की आजचा बैसाखीचा दिवस अतिशय पवित्र दिवस आहे.

गुरुसाहेब अतिशय प्रेमाने समजावतात की प्रेमच परमात्म्याचे दुसरे स्वरूप आहे. परमात्मा समुद्र असून सतगुरु त्या समुद्राची लाट आहे तर आत्मा समुद्राच्या पाण्याचा थेंब आहे. समुद्र म्हणजे पाणी आहे, लाटही पाणी आहे, तर थेंब देखील पाणीच आहे. त्यात फरक कसला असेल तर त्यांच्या एकमेकांपासून दुरावण्याचा. आत्म्यास थेंब का म्हटले गेले आहे? तर तो परमात्म्यापासून दुरावल्यामुळे. जेव्हा थेंब लाटेत सामावेल, तेव्हा तो कोठे जाईल तर समुद्रामध्ये. संतमहात्मे त्या परमात्म्यारूपी समुद्राच्या लाटा आहेत. त्यांना जोपर्यंत परमात्म्याचा आदेश असतो, तोपर्यंत त्या लाटा निर्माण होतात. ज्या लोकांना नाम देण्याचा त्यांना आदेश असतो, त्यांना ते नामदान देतात. त्यांना याजगात येण्याचा आनंद नसतो का परत जाण्याचे दुःख असते.

***घल्ले आए नानका सद्दे उठ जाए ।***

आपण प्रेमाने सांगता, ''जे आत्मा परमात्म्यापासून दुरावले आहेत, त्यांचे जीवन ते कसे व्यतीत करतात? आपण या ऐहीक वस्तूंकरीता रात्रंदिवस तडफडत असतो, रात्र-रात्रभर तळमळत राहतो. व्यवहारात जर थोडासा तोटा झाला तर आपली काय अवस्था होते? परंतु कोणी प्रिय परमात्म्यासाठी रात्री जागरण केले? त्याच्यासाठी कोणी रूदन केले? किंवा त्याची कमतरतेची कधी कोणास जाणीव झाली? मनुष्य जन्मापूर्वी आपण कोठे होतो व कोठे जाणार आहे याचा कधी विचार केलात?''

मला देश-विदेशात फिरण्याची संधी मिळाली आहे. न्यु हैम्पशायर या अमेरिकेतील युनिव्हर्सिटीच्या कोणा योगीचा चेला असणाऱ्या मुख्याध्यापकाने तेथे माझ्या व्याख्यानाची सोय केली होती. मी तेथे जाऊन हेच बोललो की मनुष्याने सर्वप्रथम तीन गोष्टींवर लक्ष द्यावयास हवे की मी या जगात येण्यापूर्वी कोठे होतो? येथे जाऊन मी काय करावयास हवे? येथून नंतर मी कोठे जाणार आहे? मनुष्याने जर या तिन्ही गोष्टींची उकल केली, तर त्याच्यामध्ये व परमेश्वरामध्ये काहीच फरक राहत नाही?

हिंदुस्थानातील सर्व प्राचीन ग्रंथ पुनर्जन्म आहे असे मानतात. पुनर्जन्मामध्ये आत्म्यास अनेकदा उच्च जन्मामध्ये अनेकदा नीच जन्मामध्ये जावे लागते. त्या मुख्याध्यापकाने मला या जगाविषयी प्रश्न विचारले. अनेकदा प्रश्नकर्ता विचार करीत नाही की समोरच्याने हाच प्रश्न मला विचारल्यास मी त्याचे काय उत्तर देऊ? त्या मुख्याध्यापकाने जो प्रश्न मला विचारला, तोच प्रश्न मी त्यास विचारला. मी हे देखील म्हणालो की तुझे वक्तव्य माझ्या व्याख्यानाशी मिळते-जुळते नाही. त्याने माझ्यासमोर कान पकडून माझी माफी मागितली.

अमेरिकेमध्ये असा रिवाज आहे की व्याख्यान दिल्यानंतर श्रोत्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी काही वेळ थांबावे लागते. कारण अनेक श्रोत्यांना प्रश्न विचारायचे असतात. परंतु त्यावेळी परमात्म्याच्या चमत्काराने मला प्रश्न विचारण्यासाठी कोणी थांबलेच नाही. त्यावर रसल पर्किन्स हसून म्हणाला, खरेतर आम्हां अमेरिकन लोकांची जीभ (प्रश्न विचारण्यासाठी) कधीच थांबत



नाही, त्यानंतर मात्र मी नियम बनविला की माझ्याकडे ठराविक वेळच उपलब्ध असल्याने मी सत्संगी व्यक्तींना सोडून इतर कोणाकडेही जाणार नाही.

महाराज सावन सिंहजी देखील उदाहरण देत असत अमेरिकन लोकांची जीभ आणि पंजाबी लोकांचे हात कधीच शांत राहत नाहीत. बसल्या-बसल्या तो काहीना काही करीतच राहतो. आपण या अगोदर (पूर्वजन्मी) कोठे होतो? याचे ज्ञान आपणांस पारब्रम्हात गेल्यावर होते. तेथे गेल्यावर अंतर्यातील मार्ग एखाद्या पुस्तकाप्रमाणे उघडला जातो. या जगात येऊन आपण काय करावयास हवे? मनुष्य येथे मद्य, मांस खाण्यासाठी आलेला नसतो. अपत्ये, पती, पत्नी आपणांस प्रत्येक जन्मामध्ये मिळत आलेले असतात. त्यामुळे त्यांचे केवळ पालनपोषण करणे हे या जन्माचे कार्य नसते. मुनष्यजन्म ही काही काळापुरती परमात्म्याची भक्ती करण्यासाठी मिळालेली संधी असते. आपण भक्ती केल्यास मनुष्य जन्मानंतर आपण कोठे जाणार आहोत? हे देखील पाहू शकतो. गुरु नानक देवजी महाराज म्हणतातः

***मोया जित घर जाईये, तित जिवंदया मर मार ।***

मृत्यूनंतर ज्या घरी आपणांस जायचे आहे, ते घर आपण जिवंतपणीच पाहू शकतो. आपले घर कसे आहे? ते कोणते ठिकाण आहे? तेथे आपला काळजीवाहक कोण आहे? हे सर्व पाहू शकतो. परंतु जे परमात्म्यापासून दुरावले आहेत, त्यांचे जीवन कसे बरे व्यतीत होते?

**हरि साजनु पुरखु विसारि कै लगी माइआ धोहु ।।**

जेव्हापासून या जगाची निर्मिती झालेली आहे, आपण या जगात कोणत्या ना कोणत्या रूपाने येत आहोत. पशु, पक्षी, कुत्रा, साप वा मनुष्य अशा कोणत्या ना कोणत्या रूपात नक्कीच येत असतो. आपणांस जर कधी नाम प्राप्त झाले असते, सतगुरु लाभले असते, आपण त्यांची भक्ती केली असती, तर आपणांस या दुःखी जगात वारंवार येण्याची काय गरज होती? ज्याप्रमाणे चोरांकरीता तुरुंग असतो, सदगृहस्थांसाठी नाही, त्याचप्रमाणे आपण जर परमात्म्याची भक्ती करून त्यामध्ये सामावून गेलो, तर आपणांस या शरीररूपी पिंजऱ्यामध्ये येण्याची काय गरज होती?

गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतात, ''तुमचा खरा सखा कोण आहे? खरा सखा तोच आहे जो आपणांस आपल्या अडचणीच्या वेळी मदतीस येतो. परंतु आपण मात्र त्यास विसरतो.'' दुर्दैव आहे की मृत्यूसमयी आपण पाहतो की वृद्ध वेदनांनी कण्हत असतो, तर मुले बाजूस बसलेली असतात. अशावेळी जास्तीत जास्त ते काय करू शकतात, तर त्या वृद्धास पाणी पाजतील, डॉक्टरांकडून औषधे आणून देतील. परंतु यापेक्षा ते अधिक काही करू शकत नाहीत. मृत्यूनंतर ते काहीच करू शकत नाहीत. मायाने ब्रम्हा, विष्णू, शिव तसेच इतर मोठमोठ्यांना दगा दिलेला आहे. गुरु नानकदेवजी सांगतातः

***ऐके माई जुगत बेआई तीन चेले परवान ।***
***इक संसारी इक भंडारी इक लाए दीवान ।***
***ओह वेखे ओहना नदर न आवे बहुता ऐहो वडान ।***
***आप निरंजन होया न्यारे भार सृष्टि का इन पर डारे ।।***

आपण सांगता की काळाने ब्रम्हास जन्मास घातले. ब्रम्हाने पाताळ धुंडाळले, परंतु त्यास सत्पुरुषाचे दर्शन काही झाले नाही. सत्पुरुष भेटले असते तरच त्यास आज्ञा मिळाली असती. परंतु तो भ्रमात सापडला. ब्रम्हा, विष्णू व महेश हे तिघेही मायारूपी मातेचे पुत्र आहेत. ते तिघेही परमात्म्याच्या आदेशानुसारच त्यांचे कार्य करतात. जन्म-मृत्यूच्यापुढे ते देखील जाऊ शकत नाहीत. सर्व देवी-देवता या विश्वाच्या रचनेचे एक भाग आहेत. मनुष्य व त्यांच्यामध्ये एवढाच फरक आहे की त्यांचे आयुष्यमान मोठे आहे तर मनुष्याचे आयुष्यमान अल्प आहे.

या देवी-देवतांना परमात्मा पाहत असतो, परंतु ते मात्र परमात्म्यास पाहू शकत नाहीत. आपण मात्र यांना मोठे समजून त्यांची पूजा-अर्चा करतो. परंतु परमात्म्यास पाहण्याचा व भेटण्याचा अधिकार केवळ मनुष्यासच आहे. ज्याप्रमाणे शेतकरी शेतीकाम करतो, त्याचप्रमाणे परमात्म्याने त्यांना कामे सोपविली आहेत की ब्रम्हास सृष्टीची रचना करण्याची जबाबदारी दिली, विष्णूला या विश्वाच्या पालन-पोषणाची जबाबदारी दिली तर शिवास त्यांच्या संहाराची जबाबदारी दिली. तुम्ही गीता वाचून पहा! तेथे या सर्वांचे आयुष्यमान लिहिलेले आहे. भागवतामध्ये कृष्ण भगवान उद्धवास सांगतात की हा रांगणारा किडा कित्येक वेळा स्वर्गाचा राजा तसेच ब्रम्हा होऊन गेला आहे. तुम्हीच पहा जर स्वर्गाच्या राजासही किड्याचा जन्म घ्यावा लागतो, तर त्यासमोर आपण काय आहोत? आपला खरा सखा परमात्माच आहे, ज्याच्याशी आपली गाठ सतगुरु घालून देतात. परंतु आपण मायेच्या फसवणुकीमध्ये अडकलेलो आहोत.

## पुत्र कलत्र न संगि धना हरि अविनासी ओहु ।।

आपणांस ज्या पती, पत्नी, मुले, नातवंडे व धनाचा अहंकार असतो, आपल्या मृत्यूसमयी ते कोणीही आपल्या मदतीस येत नाहीत. जे सतगुरु आपणांस नाम देतात, ते देहरूपी नसून ते अविनाशी असतात. ते बाह्यस्वरूपात आपणांस नामाशी जोडतात तर अंतर्यामधील मंडळे पार करतानाही आपणांस ते मदत करतात. खरोखरच! ही किती आश्चर्यजनक गोष्ट आहे.

## पलचि पलचि सगली मुई झूठै धंधै मोहु ।।

आपल्या अनेक वडिलधारी पूर्वजांनी या जगात मेहनत करून करून धन कमावले, पण शेवटी मात्र मोकळ्या हातानेच हे जग सोडून निघून गेले, त्याच मार्गाने आपणांस देखील जावे लागणार आहे. कबीर साहेब म्हणतातः

***मुट्ठी भींचकर जन्म लिया है हाथ पसारे जाओगे ।***
***कहत कबीर सुनो भई साधो इक नाम बिना पछताओगे ।।***

## इकसु हरि के नाम बिनु अगै लअहि खोहि ।।
## दयु विसारि विगुचणा प्रभ बिनु अवरु न कोइ ।।

सतगुरुंना व त्यांच्या उपदेशास आपण विसरल्यास, त्यांच्याशिवाय आपली मदत दुसरा कोण करणार आहे? आपला रक्षणकर्ता कोण आहे? परमात्म्याच्या दरबारात आपली शिफारस कोण करेल? सतगुरु परमात्म्याचा संदेश घेऊन आपल्याकडे येतात. आपल्या एखाद्या प्रिय व्यक्तीचा निरोप घेऊन जर एखादा निरोप्या आल्यास, आपणांस त्या निरोप्याबद्दल देखील आपुलकी वाटते; कारण तो आपल्या प्रिय व्यक्तीचा निरोप घेऊन आलेला असतो. परंतु आपण जर सतगुरुंना विसरलो, त्यांच्या शिकवणुकीनुसार वागलो नाही, तर आपणांस कोणाचाच आसरा राहणार नाही.

## प्रीतम चरणी जो लगे तिनकी निरमल सोइ ।।

जे सतगुरुंना आपल्या अंतर्यामध्ये प्रगट करून घेतात, सतगुरुंच्या चरणी स्वतःस वाहून घेतात, त्यांचीच शोभा पवित्र आहे. मी म्हणत असतो:

***किसी काम का थे नहीं कोई न कौडी दे ।***
***कृपाल सिंह सतगुरु मिलया भई अमोलक देह ।।***

प्रियजनहो! जे आत्मा सतगुरुंच्या मार्गदर्शनानुसार जीवन जगतात ते स्वत: तर अनमोल बनतातच, परंतु ज्या देहात ते आत्मा वास्तव्य करीत असतात ते देहही अनमोल बनवितात. त्यांचे दर्शन घेणारा त्या शरीरासही अतिशय प्रेमाने पाहत असतो. गुरु अर्जुनदेवजी महाराज सांगतातः

***मैं देख देख न रजहां गुरु सतगुरु देहा ।***

आपण म्हणता,''माझे सतगुरु रामदासजी महाराजांच्या देहाचे दर्शन कितीही केले तरी माझे समाधान होत नाही.'' माझ्या भजनात तुम्ही वाचता की मी त्यांचे सुहास्य चेहऱ्याचे केलेले दर्शन आयुष्यभर विसरू शकत नाही.

ते हसत हसतच मला परमात्मा कृपाल रूपी अमर निशाणी देऊन गेले. परमात्म्यारूपी सतगुरु स्वतः तुमच्याकडे येतील असा त्यांनी मला वर दिला होता. त्यांनी दिलेला तो वर वाया गेला नाही. ब्रह्मांड पलटून जाईल, पण संतांचे वाक्य मात्र बदलणार नाही. आपली श्रद्धा मात्र त्यांच्या वक्तव्यावर असली पाहिजे. मी सांगत असतो की मी लहानपणापासूनच महाराज सावन सिंहजी महाराजजींच्या वाढदिवस साजरा करीत आलो आहे. अशारितीने महान सतगुरु आपल्यावर कृपादृष्टी करत असतात. त्यांना जर आपण विसरलो तर आपला सखा दुसरा कोण आहे?

**नानक की प्रभ बेनती प्रभ मिलहु परापति होइ ।।**
**वैसाखु सुहावा तां लगै जा संतु भेटै हरि सोइ ।।**

गुरु नानक देवजी महाराजजींनी वर्षातील प्रत्येक महिन्याची तुलना मनुष्य जन्माशी केली आहे, हे सुरवातीसच सांगितले आहे. ज्यांना परिपूर्ण महात्मा लाभले त्यांच्यासाठी हा वैशाखाचा महिना पवित्र महिना आहे, त्यांना तो परमार्थामध्ये सहाय्यकारी आहे. त्यांनी अतिशय श्रद्धेने महात्म्यांची संगत-सोबत केली, महात्म्यांनी त्यांना नामदान दिल्यानंतर ते त्यांनी दाखविलेल्या मार्गावर चालू लागले. म्हणून गुरुसाहेबांनी जे काही आपणांस समजावले आहे, त्यानुसार वागून आपण आपले जीवन पवित्र करणे हे आपले कर्तव्य आहे. परमात्म्याने मनुष्य जीवन देऊन त्यास भेटण्याची अतिशय सुंदर संधी आपणांस दिली आहे, जिचा आपण फायदा करून घेणे गरजेचे आहे. ***

## धन्य अजायब

**दिल्ली शहरातील सत्संगाचा कार्यक्रम - १६ ते १८ मे २०१४ - कम्युनिटी हॉल, भेरा एन्क्लेव, पश्चिम विहार (पीरागडी चौक जवळ) नवी दिल्ली - ११० ०८७**

# सावन प्यारे बक्शन हारे



सावन प्यारे बक्शन हारे, दुःखियां दे दर्द निवार दयो (२)

रूहां सड़दियां तपदियां साडियां (२)
अमृत प्याके ठार दयो, (२) सावन प्यारे.....

असीं भुल्ल गए तेरे नाम नूं, (२)
साडी बिगड़ी नूं आ के सवार दयो, (२) सावन प्यारे.....

बेड़ा सागर विच ठिल गया, (२)
बनो मल्लाह ते तार दयो, (२) सावन प्यारे.....

दया करो नाम जपा लवो, (२)
साडी होमैं हंगता नूं मार दयो, (२) सावन प्यारे.....

हत्थ बन अरजां हैं मेरियां, (२)
गरीब 'अजायब' दी सार लयो, (२) सावन प्यारे.....